23 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुण्यनगरी

# तरुणांनी सकारात्मक राहण्याची गरज

## - डॉ. डी. आर. मोरे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

आजच्या तरुणाईला शिक्षणाच्या चांगल्या संधी मिळत आहेत; पण दर्जा सुधारण्याबाबत अजूनही प्रयत्न होण्याची गरज असून तरुणांनी केवळ पदवी घेऊन न बसता त्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत सकारात्मक राहण्याची आवश्यकता आहे, असे मत बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी केले. कोल्हापूर वुई केअर-कॅम्पेशन २४ यूथ अनेक्स आणि जुगाड काऊन्सिलिंग सेंटर यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.




**कोल्हापूर वुई केअर-कॅम्पेशन २४ यूथ अनेक्स आणि जुगाड काऊन्सिलिंग सेंटरच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेचे उद्‌घाटन कुंडीतील रोपट्यास पाणी घालून करताना डॉ. डी. आर. मोरे.**

यावेळी गृह पोलीस उपअधीक्षक सतीश माने, वुई केअरचे अध्यक्ष मिलिंद धोंड, मिसेस महाराष्ट्र गौरी शिरोडकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी यूथ अनेक्स आणि जुगाड काऊन्सिलिंग सेंटर यांच्या वतीने आयोजित व्याख्यानात मोरे बोलत होते.

डी. आर. मोरे म्हणाले, व्यक्तिमत्त्व विकासासाठी इंग्रजी भाषेला आत्मसात करणे ही काळाची गरज आहे. गेल्या ७० वर्षांच्या काळात देशातील शैक्षणिक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल झाले आहेत.

प्रसन्न रबडे म्हणाले, व्यक्तिमत्त्व विकास आणि रोल मॉडेलचा संबंध नाही; पण अशा रोल मॉडेलपासून ऊर्जा मिळते, असा मर्यादित अर्थ व्यक्तिमत्त्व विकासाचा काढता येईल.

शुभांगी खासनीस म्हणाल्या, शिक्षणानंतर खऱ्या अर्थाने करिअरला सुरुवात होते. त्यामुळे युवकांनी शिक्षण आणि करिअर यामधील फरक समजून घेण्याची गरज आहे. व्यक्तिमत्त्व विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. देशाची प्रतिमा व्यक्तिमत्त्व विकासावरच अवलंबून आहे. उत्तम आणि चारित्र्यवान नागरिक बनण्याचे ध्येय तरुणांनी ठेवल्यास व्यक्तिमत्त्व तयार होते. यावेळी वुई केअरचे अध्यक्ष तेजस्विनी गायकवाड, रौनक शहा, सुशील गांधी यांची प्रमुख उपस्थिती होती. मिलिंद धोंड यांनी वुई केअरच्या उपक्रमांचा आढावा घेतला.

23 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# 'कौशल्य व रोजगार' मेळाव्यास तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या करिअरची निवड करताना आवडीचे क्षेत्र निवडावे. स्वत:च्या विकासासाठी विविध कौशल्य आवश्यक आहेत. इच्छाशक्ती, ज्ञान लालसा, क्रयशक्ती असल्यानंतर काम कौशल्यपूर्वक करता येतात, प्रतिपादन शिवाजी विद्यापीठमधील वाणिज्य शाखेचे विभागप्रमुख डॉ. ए. एम. गुरव यांनी केले.

गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालयात राज्य शासन विद्यापीठ कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र व गोपाळकृष्ण गोखले महाविद्याल यांच्या संयुक्त विद्यमाने 'कौशल्य व रोजगार मेळाव्या"चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. रोपाला पाणी घालून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. प्राचार्य डॉ. जे. बी. पिष्टे अध्यक्षस्थानी होते.



कोल्हापूर : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव यांनी उद्घाटन केले. सोबत प्रा. जयकुमार देसाई, प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे, डॉ. ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. जे. बी. पिष्टे व आदी.

यावेळी डॉ. गुरव म्हणाले, गुंतागुंतीचे प्रश्न सोडविणे, चिकित्सक वृत्ती, सृजनशीलता, मनुष्यबळ हाताळण्याचे कौशल्य, समन्वय, भावनिक नियंत्रण, निर्णयक्षमता आदी गुणवैशिष्ठ्ये विद्यार्थ्यांनी अंगी बाणविणे आवश्यक आहे. काळाबरोबर आपले ज्ञान अद्ययावत करण्याची गरज ही त्यांनी यावेळी सांगितली. कॉर्पोरेट ट्रेनर अजय म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या रोजगार मेळाव्यामध्ये विविध १३ कंपन्यामधील ४२४ रिक्त जागा भरण्यासाठी आयोजित करण्यात आला होता. ७९१ विद्यार्थ्यांनी मेळाव्यास भेट दिली. तसेच प्राथमिक फेरीत १९८ उमेदवारांची निवड करण्यात आली.

यावेळी कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्राचे सहायक संचालक सचिन जाधव, शिक्षण प्रसारक मंडळाचे सेक्रेटरी प्रा. जयकुमार देसाई. प्रा. डॉ. मंजिरी देसाई-मोरे, उपप्राचार्य एन. सी. जाधव यांची उपस्थिती होती. सचिन जाधव यांनी प्रास्ताविक तर प्रा. पी. बी. झवरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. आर. बी. भूयेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2017

तरुण भारत

# विद्यापीठात २८ पासून चित्रशारदा स्पर्धा

**कोल्हापूर** : कोल्हापुरातील महाविद्यालयीन युवक व युवतींनी प्रथमच एकत्र येऊन अविरत प्रॉडक्शनतर्फे आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या सहकार्याने यंदा 'चित्रशारदा" या नावाने कलात्मक स्पर्धेचे आयोजन केल्याची माहिती अविरत प्रॉडक्शनचे समन्वयक अविरत पन्हाळकर आणि चित्रपट महामंडळाचे उपाध्यक्ष धनाजी यमकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

याबाबत अविरत पन्हाळकर यांनी सांगितले की, कोल्हापूरला कलानगरी म्हणून ओळखले जाते. अलीकडच्या काळात मराठी चित्रपट व नाट्य तसेच इतर अनुषांगिक कलांना उत्तेजन मिळत असून त्यातून प्रबोधन होत आहे. या पार्श्वभूमीवर अविरत प्रॉडक्शनने चित्रशारदा या नावाने कलात्मक स्पर्धेचे आयोजन केले असून या स्पर्धेला अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे सहकार्य लाभणार आहे. ही स्पर्धा २८ आणि २९ जानेवारी रोजी शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात होणार आहे. पन्हाळकर पुढे म्हणाले, पटकथा लेखन, प्रकाश व नेपथ्य आणि अभिनय या तीन विषयावर आधारित स्पर्धा असणार आहे. या स्पर्धेसाठी प्रवेश फी ठेवण्यात आली असून आकर्षक रक्कमेची बक्षिसेही दिली जाणार आहेत. स्पर्धेसाठी ५५० प्रवेशिका प्राप्त झाल्या आहेत. अधिक माहितीसाठी अखिल भारतीय चित्रपट महामंडळ किंवा अविरत प्रॉडक्शनशी संपर्क साधावा.

धनाजी यमकर म्हणाले, या स्पर्धेच्या शुभारंभाला ज्येष्ठ चित्रपट निर्माते राजदत्त आणि रामदास फुटाणे यांच्यासह अखिल भारतीय चित्रपट महामंडळाचे संचालक उपस्थित राहणार आहेत. अभिनयाबाबत अभिनेत्री वर्षा ऊसगावकर, विजय पाटकर आदींचे मार्गदर्शन लाभणार आहे. पत्रकार राज काझी, संकलक विजय खोचीकर, दिग्दर्शक कांचन नायक कला दिग्दर्शक संतोष फुटाणे, व्ही.एम. मयेकर आदी उपस्थित राहणार आहेत, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेला स्वाती परब, शरद जाधव, रणजीत जाधव, आर.ए. निकम आदी उपस्थित होते.

23 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# पत्रकारितेत कौशल्याचा वापर महत्त्वाचा

## ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांचे प्रतिपादन, पत्रकारांनी बातमीच्या मुळापर्यंत पोहचणे महत्त्वाचे

प्रतिनिधी
कोल्हापूर

स्पर्धेच्या युगात वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक मीडियापुढील आव्हाने वाढत आहेत. त्यामुळे पत्रकारांनी बातमीच्या मुळापर्यंत पोहचून सत्य शोधले पाहिजे. पत्रकारिता क्षेत्रात धाडस, कल्पनाशक्ती व कौशल्याला संधी आहे. म्हणून पत्रकारितेत कष्टाबरोबर बुद्धी आणि कौशल्याचा वापर महत्त्वाचा आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन आणि दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पत्रकारिता कार्यशाळे'च्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन 'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

अर्थतज्ज्ञ डॉ. पाटील म्हणाले, पत्रकार समाजातील चुकीच्या गोष्टीची आक्रमक मांडणी करीत संबंधिताला मार्ग दाखवतो. वृत्तपत्रातील प्रभावी बातम्यांमुळेच वृत्तपत्राचा खप वाढतो. त्यामुळे पत्रकारांनी एखाद्या घटनेचे विविध पैलू उलगडत विशिष्ट पद्धतीने मांडणी केली पाहिजे. कारण माहिती देणे, करमणूक करणे, विश्लेषण व मार्गदर्शक करणे ही वृत्तपत्रांची मुख्य भूमिका आहे.




कोल्हापूर : 'पत्रकारिता कार्यशाळे'च्या उद्घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. जे. एफ. पाटील. सोबत डावीकडून सुरेश रोटे, डॉ. पद्मजा पाटील, जयसिंग पाटील, डी. ए. पाटील, जीवनधर चौगुले, विजयकुमार शेटे.

'तरुण भारत'चे निवासी संपादक जयसिंग पाटील म्हणाले, एखाद्या घटनेचे विविध पैलू समजून घेऊन बातमी लिहणे हा पत्रकारितेचा गाभा आहे. स्वातंत्र्यपुर्व काळात विशिष्ट ध्येयाने पत्रकारिता केली जात होती. स्वातंत्र्यानंतर पत्रकारितेला व्यवसायिक स्वरूप प्राप्त झाले. पत्रकारांनी बदलते वास्तव समजून घेण्याची गरज आहे. सध्या पत्रकारिता क्षेत्रामध्ये गुणवत्तेला अतिशय महत्त्व आहे. पत्रकाराच्या गुणवत्तेवर त्याचे मूल्यमापन केले जाते. त्यामुळे नवोदित पत्रकारांनी आपली गुणवत्ता सिद्ध केली पाहिजे.

विविध विषयावर ज्येष्ठ पत्रकार डॉ. महावीर अक्कोळे, विश्वास पाटील, गुरुबाळ माळी, मोहन हवालदार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्राचार्य श्रीधर हेरवाडे, भगवान महावीर अध्यासन केंद्राच्या समन्वयक डॉ. पद्मजा पाटील, पत्रकार अनिल देशमुख, दक्षिण भारत जैन सभा केंद्रीय उपाध्यक्ष प्रा. धीरज शिंदे, प्रशांत कुचेकर, आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. सुप्रिया खोले, प्रियंका पाटील यांनी केले. आभार पार्श्वनाथ पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन

कोल्हापुर : प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वृत्तपत्र विद्या आणि संवाद शास्त्र विभागाच्या वतीने पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन २४ जानेवारी रोजी शिवाजी विद्यापीठात करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या आणि संवाद शास्त्र विभागाने अलीकडेच यूनिसेफ, महाराष्ट्र सोबत महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे.

या भागीदारी अंतर्गत संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्ट्य पूर्तीसाठी विभागाकडून वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'सामाजिक हिंसा आणि शोषण' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पत्रकारांना पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. सहभागी होऊ इच्छीणाऱ्या पत्रकारांनी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधण्याचे आवाहन विभाग प्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2017

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात 'एनएनएस' समन्वयकांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्र विभागाच्या वतीने महाविद्यालयांतील एन.एस.एस. समन्वयकांसाठी दोनदिवसीय कार्यशाळेचे दि. २७ आणि दि. २८ रोजी शिवाजी विद्यापीठात आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी एन.एस.एस. समन्वयकांना पूर्वनोंदणी करणे आवश्यक आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या समन्वयकांनी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

23 JAN 2017

जनसंपर्क-कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

## जयसिंगराव पवार : मोडी लिपी मागोवा शिबिरात मांडले परखड विचार

# अभ्यासकांना सामाजिक भान आवश्यक

कोल्हापूर : इतिहास संशोधकांना मोडी कागदपत्रे विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. या माध्यमातून संशोधनामध्ये मौलिक भर पडू शकते. मोडी अभ्यासकांना त्या-त्या काळाचे सामाजिक स्थितीचे भान असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचा प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीतर्फे आयोजित मोडी लिपी माजी विद्यार्थी मागोवा शिबिरात ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. पवार म्हणाले, इतिहास संशोधनात मोडी कागदपत्रांचे महत्त्व अमूल्य आहे. शिवकालीन कागदपत्रांचे संशोधन करताना डॉ. बापूजी साळुंखे, डॉ. आप्पासाहेब पवार, वा. सी. बेंद्रे अशा ज्येष्ठ संशोधकांचा सहभाग लाभला. त्यामुळेच इतिहास क्षेत्रामध्ये योगदान देता आले. प्रभारी कुलगुरु डॉ. मोरे म्हणाले, इतिहास विजयाच्या बाजूने लिहीला जातो. त्यामुळे इतिहास पुनर्लेखनाची गरज निर्माण झालेली आहे. यासाठी मोडी दस्तऐवजांची गरज लागते. आजच्या काळात ऊर्दु, अर्धमागधी, पाली या भाषांचा स्त्रोत कमी होत चालला आहे. त्यांच्या अभ्यासाला चालना देण्याची गरज आहे. ते काम विद्यापीठ करत आहे. कार्यक्रमात विस्तार कार्यविभाग प्रमुख डॉ. सुमन बुवा, मोडी इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह राजेयादव, वसंत सिंघण यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आर. एस. कुलकर्णी, अशोक सडोलीकर, पीर महमद नवाब, सुनील मोहिते, मनवीर केसरकर, वीरेंद्र सोलापुरे आदी उपस्थित होते. विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले. आदित्य मैंदगीकर यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



**शिवाजी विद्यापीठात मंगळवारी झालेल्या मोडी लिपी माजी विद्यार्थी मागोवा शिबिरात ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. सुमन बुवा, प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.**

### मोडी लिपीबाबत मार्गदर्शन

या शिबिराच्या दुसऱ्या सत्रात उदयसिंह राजेयादव यांचे 'मोडी लिपी कागदपत्रे : सद्यस्थिती, लेखन-वाचन व प्रशस्ती' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी ग्रंथपाल डॉ. नमिता खोत अध्यक्षस्थानी होत्या. नवीनकुमार माळी यांचे 'मोडी लिपी-आधुनिक संगणकीय प्रवाह आणि तंत्रज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. अरुण शिंदे होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2017

तरुण भारत

# संप्रेषणाचा विकास ही काळाची गरज

कोल्हापूर : शैक्षणिक संकुलांच्या माध्यमातून संप्रेषणाचा विकास मोठ्या प्रमाणात करणे, ही काळाची गरज बनली आहे, असे प्रतिपादन प्रा. डॉ. नारायण चौधरी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाच्यावतीने आयोजित केलेल्या व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे होते.

डॉ. नारायण चौधरी

डॉ. चौधरी म्हणाले, संप्रेषणाचा वापर समाजातील सर्वच क्षेत्रात अपरिहार्य झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रात संप्रेषणाचा वापर जर मोठ्या प्रमाणात झाला तर शिक्षणाची गंगा खेडयापर्यंत पोहचवण्यास मदत होईल. डॉ. जगन कराडे म्हणाले, संशोधकांनी समाजाप्रती बांधील राहून संशोधन केले पाहिजे. अन्यथा, संशोधनाला कोणताही अर्थ राहणार नाही.

प्रास्ताविक, डॉ. श्रीमती प्रतिभा देसाई यांनी तर आभार डॉ. प्रल्हाद माने यांनी मानले. डॉ. श्रीमती प्रतिमा पवार यांच्यासह संशोधक विद्यार्थी, एम. ए. चे विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# कॉलेज विद्यार्थ्यांसाठी कलात्मक स्पर्धा

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

कॉलेज विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांना सिनेमाशी निगडीत विविध क्षेत्रांची ओळख घडावी याकरिता अविरत प्रॉडक्शनतर्फे २८ आणि २९ जानेवारी रोजी चित्रशारदा या नावांनी कलात्मक स्पर्धेचे आयोजन केले आहे. दोन दिवसीय स्पर्धेत अभिनय, पटकथा लेखन आणि प्रकाश नेपथ्य योजना या तीन विषयावर स्पर्धा घेण्यात येईल. अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या सहकार्याने ही स्पर्धा होत असल्याची माहिती महामंडळाचे उपाध्यक्ष धनाजी यमकर व प्रॉडक्शनचे अविरत पन्हाळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्र येथे २८ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता स्पर्धेचे उद्घाटन होणार आहे. वैयक्तिक आणि सांघिक मिळून ५०० हून अधिक विद्यार्थ्यांनी आतापर्यंत सहभाग नोंदिवला आहे. कलाक्षेत्रातील करिअरसाठी प्रोत्साहन मिळावे हा स्पर्धा घेण्यामागील उद्देश असल्याचे पन्हाळकर यांनी सांगितले.

सिनेदिग्दर्शक राजदत्त, निर्माते रामदास फुटाणे यांच्यासह महामंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत स्पर्धेचे उद्घाटन होईल. स्पर्धेच्या कालावधीत अभिनेत्री वर्षा उसगांवकर, अभिनेता सुशांत शेलार, दिग्दर्शक कांचन नायक, संकलक विजय खोचीकर, कलादिग्दर्शक संतोष फुटाणे, राज काझी आदी मार्गदर्शन करणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीसे देण्यात येणार आहेत. पत्रकार परिषदेला महामंडळाचे खजानिस शरद चव्हाण, अरुण चोपदार, सुरेंद्र पन्हाळकर, अर्जुन नलवडे, आर. ए. निकम, स्वाती परब आदी उपस्थित होते.